# तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी पन्हाळा

संकलनः- आस्थापना

दुरध्वनी क्र 02328-235326 E mail Id tahpanhala1@gmail.com

क्र.आस्था/कावि/625/2023 दिनांक:- 10/08/2023

वाचले - 1) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय के.ओटी-2012/प्र.क्र.432/ई-10 दिनांक 05.09.2013

2) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण-2023/प्र.क्र.17/ई-10 दिनांक 17.05.2023

3) मा.सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) विभागीय आयुक्त कार्यालय पुणे विभाग, पुणे यांचेकडील दिनांक 27.06.2023 चे पत्र बिंदूनामावली नोंदवही पडताळणी

4) मा.जिल्हाधिकारीसो कोल्हापूर यांचेकडील क्र.कार्या.8/इनाम/आरआर /589/2023 दिनांक 28.06.2023 चे पत्र.

5) मा.जिल्हाधिकारीसो कोल्हापूर यांचेकडील क्र.कार्या.8/इनाम/आरआर /728/2023 दिनांक 03.08.2023 चे पत्र.

6) या कार्यालयाकडील कोतवाल आरक्षण सोडत दिनांक 10.08.2023

## -:कोतवाल भरती जाहीरनामा- 2023 :-

उपरोक्त आदेशाचे अनुषंगाने तमाम लोकांना या जाहीर निवेदनाव्दारे कळविणेत येते की, पन्हाळा तालुक्यातील खालील सजांचे कोतवाल पद रिक्त असल्याने त्या रिक्त पदावर नविन कोतवाल भरती करणेत येणार आहे. त्या करीता पात्र उमेदवारांनी आपले अर्ज दिनांक 11.08.2023 ते दिनांक 24.08.2023 पर्यंत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी 9.45 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत तहसिलदार पन्हाळा यांच्या कार्यालयात सादर करावेत. उमेदवारांनी आपले अर्ज मुदतीच्या आत व्यक्तीशः तहसिलदार पन्हाळा यांच्या कार्यालयात सादर करावेत. दिनांक 24.08.2023 नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**कोतवाल पदे रिक्त असलेल्या सजांची नांवे आणि सजातील पद कोणत्या संवर्गासाठी आरक्षित करणेत आलेले आहे त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | सजाचे नांव | आरक्षणाचा प्रवर्ग | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | पन्हाळा | विशेष मागास प्रवर्ग | 01 |
| 2 | बोरपाडळे | अनुसूचित जमाती | 01 |
| 3 | देवाळे | इतर मागास वर्ग | 01 |
| 4 | कोतोली | विमुक्त जाती अ | 01 |
| 5 | आळवे | इतर मागास वर्ग महिला | 01 |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | कळे | अनुसूचित जाती महिला | 01 |
| 7 | वाघवे | इतर मागास वर्ग | 01 |

**कोतवाल पदाकरीता उमेदवार खालील अटीस पात्र आसावा.**

1. उमेदवार शारिरीक दृष्टया सदृढ असावा.
2. अर्जदार किमान इयत्ता चौथी (4 थी) उत्तीर्ण आवश्यक आहे.
3. दिनांक 01.08.2023 रोजी वय 18 वर्षापेक्षा कमी व 40 वर्षापेक्षा जास्त नसावे
4. अर्जदार हा तलाठी सजा अंतर्गत असलेल्या गांवातील रहिवाशी असावा.
5. अर्जदार व्यक्तीस कोणत्याही गुन्हयात कोणत्याही प्रकारचा दंड अगर शिक्षा झालेली नसावी.
6. अर्जदार ज्या सजासाठी अर्ज करण्यास इच्छुक असेल त्या सजेस असणा-या आरक्षण वर्गवारीत मोडणारा असावा.

## अर्ज करण्याची पध्दत

1 अर्ज हा विहित नमुन्यात असावा. उमेदवाराने अर्ज सादर करताना ज्या तलाठी सजा करीता अर्ज सादर केला आहे त्याबाबत स्पष्ट नमुद करावे.

2 विहित नमुन्यातील अर्ज तहसिल कार्यालय पन्हाळा येथील कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

3 अर्जासोबत सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रति (True copy) जोडाव्यात.

4 उमेदवार अनुसूचीत जाती / जमाती व खुल्या प्रवर्गातील उमेदवार व्यतिरीक्त प्रवर्गातील असल्यास अशा उमेदवारांना उन्नत व प्रगत (क्रिमीलेअर) गटात मोडत नसल्या बाबतचे वैध प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

5 खुल्या प्रवर्गातील उमेदवारास अर्थिक दृष्टया दुर्बल घटकासाठी अर्ज भरण्याचा असल्यास अर्थिक दुर्बल घटकाचे (EWS) प्रमाणपत्र आवश्यक राहील.

6 खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता 30 टक्के आरक्षणाच्या सवलतीसाठी उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) या मध्ये मोडत नसल्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल. असे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास अर्ज नाकारण्यास योग्य समजला जाईल.

7 महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र) नियम 2005 मधील 4 मधील तरतुंदी नुसार कुटुंबात दिनांक 28.03.2005 नंतर जन्मलेले दोन पेक्षा जास्त अपत्य नाहीत याबाबतचा नमुना - अ मधील प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

8 अर्ज पुर्ण माहितीसह व अचुक भरावा, त्यात नमुद केरणेत आलेली सर्व माहिती खरी असणे बंधनकारक आहे.

9 उमेदवाराने पूर्ण भरलेला अर्ज शैक्षणिक पात्रता / जातीचे प्रमाणपत्र इत्यादी विहित नमुन्यात भरुन मा.

Scanned by CamScanner

तहसिलदार तथा सदस्य सचिव कोतवाल निवड समिती, तहसिल कार्यालय पन्हाळा येथे दिनांक 24.08.2023 पर्यंत सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत समक्ष अर्ज सादर करावा. विहित वेळेनंतर व मुदतीनंतर कोणत्याही प्रकारचा अर्ज स्विकारला जाणार नाही. कोणीही पोस्टामार्फत किंवा कुरिअर मार्फत अर्ज पाठवू नये. पाठवल्यास सदर अर्जाचा विचार केला जाणार नाही व कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही या बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**परिक्षा शुल्कः- उमेदवारांनी खालीलप्रमाणे परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.**

| तपशिल | खुला प्रवर्गातील उमेदवारासाठी | आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी |
|---|---|---|
| परिक्षा शुल्क | र.रु. 200/-(र.रु. दोनशे फक्त) | र.रु. 100/-(र.रु. शंभर फक्त) |

अर्जासोबत खुल्या प्रवर्गाचे जागेसाठी अर्ज करणा-या उमेदवारांस परीक्षा शुल्क र. रु. 200/- व आरक्षित प्रवर्गातील अर्ज करणा-या उमेदवारास परीक्षा शुल्क र.रु.100/- रोख स्वरुपात तहसिल कार्यालय पन्हाळा जि.कोल्हापूर येथे जमा करावे.

1. उमेदवाराचा अलीकडील काळात काढणेत आलेला पासपोर्ट आकाराचा रंगीत छायाचित्राच्या तीन प्रतीपैकी 1 प्रत अर्जावर योग्य ठिकाणी लावण्यात यावी.(उर्वरित दोन प्रति अर्जासोबत सादर कराव्यात)

2 इयता चौथी उत्तीर्ण गुणपत्रिका किंवा महत्तम शैक्षणिक गुणवत्ता दर्शविणारी गुणपत्रीका

3 वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडलेचा दाखला किंवा बोनाफाईड प्रमाणपत्र.

4 उमेदवार हा तलाठी सजा मधील समाविष्ठ असलेल्या गावातील स्थानिक रहिवाशी असल्याबाबतचे मंडळ अधिकारी/तलाठी यांचे प्रमाणपत्र आणि (घर फाळा पावती/रेशनकार्ड/निवडणूक ओळखपत्र/पॅन कार्ड/आधार कार्ड) या पैकी एखादा पुरावा जोडणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त इतर कोणताही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही.

5 मागास वर्गाकरीता उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्र (नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र)

6 खुल्या प्रवर्गातील महिला करीता आरक्षित पदांकरीता सक्षम प्राधिकारी यांचे व्दारे निर्गमित केलेले उन्न्त व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्र (नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र)

7 अर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी अर्ज भरण्याचा असल्यास अर्थिक दुर्बल घटकाचे (EWS) प्रमाणपत्र.

8 विहित नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र.

9 उमेदवार मागासवर्गीय असल्यास त्याची जात प्रवर्गाचे मुळ जात प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे

Scanned by CamScanner

बंधनकारक राहिल. तसेच शासन निर्णय क्र.बी.सी.सी.2011/प्र.क्र.1064/2011/16 व दिनांक 12.12.2021 अन्वये उपस्थित उमेदवाराच्या जात वैधता प्रमाणपत्राच्या अधिन राहून जात वैधता प्रमाणपत्र सहा (6) महिन्याच्या आत सादर करावयाच्या अटीवर बंधपत्र / शपथपत्र लिहून घेतल्या नंतर विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

10 सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**कोतवाल पदाकरीता अर्ज सादर करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे.**

**<u>कोतवाल पदाकरीता निवडीची पध्दत, अटी व शर्ती पुढील प्रमाणे.</u>**

1. कोतवाल संवर्गाची पदे भरताना 100 गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल.
2. लेखी परीक्षेसाठी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाचे 50 प्रश्न राहतील. त्यानुसार सदर लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांचे आधारे निवडसूची तयार करुन निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.
3. उमेदवारांना लेखी परीक्षेला उपस्थित राहण्या साठी येण्या - जाण्याचा प्रवास खर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही.
4. उमेदवारांची निवड ही तलाठी सजाकरीता असून त्यांअंतर्गत समावेश असणा-या गांवापैकी एका गावात त्याला वास्तव्य करावे लागेल.
5. अर्जदार यांनी अर्ज स्वतः हजर राहून सादर करावा. अर्ज पोस्टाव्दारे अथवा कुरिअर व्दारे पाठविणेत येवू नये.
6. अर्जामधील माहिती खोटी आढळल्यास अर्ज रद्द करणेत येईल किंवा नियुक्ती झालेस नियुक्ती रद्द करणेत येईल
7. उमेदवार हा शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा. नियुक्ती नंतर जिल्हा वैदयकिय मंडळाचे प्रमाणपत्र 3 महिन्याच्या आत उमेदवाराला सादर करावे लागेल. त्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. सदर प्रमाणपत्र 3 महिन्याच्या आत सादर न केलेस उमेदवाराची नियुक्ती रद्द करणेत येईल.
8. उमेदवाराने चारित्र्याबाबत संबंधित पोलीस स्टेशनचे, पोलिस निरिक्षक यांचे प्रमाणपत्र नियुक्ती नंतर सादर करावे. सदर प्रमाणपत्र 3 महिन्याच्या आत सादर न केलेस सदरची निवड रद्द करणेत येईल.
9. सदर पदभरतीसाठी प्रतिक्षा यादी प्रसिध्द केली जाईल. कोतवाल यांची अंतिम नियुक्ती झालेचे दिवसापासून एक वर्षासाठी सदर प्रतिक्षा यादी वैध राहिल. नियुक्तीच्या दिवसापासून एक वर्षाच्या आत कोणत्याही कारणाने सदरचे पद रिक्त झालेस प्रतिक्षा यादीतील सर्वात आधीच्या क्रमांकावर नमुद उमेदवारास नियुक्तीसाठी प्राधान्य दिले जाईल.
10. कोतवाल म्हणून विशिष्ठ व्यक्तीस नेमणूक करणेचे बंधन राहणार नाही. या भरती संबंधीचे सर्व अटी व शर्ती या अध्यक्ष कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी पन्हाळा

Scanned by CamScanner

विभाग पन्हाळा यांचे मान्यतेने निश्चित करणेत आले असुन सदर अटी व शर्ती तसेच इतर बाबतीत कोणतीही पूर्व सूचना न देता बदल करणेचा अधिकार राखून ठेवणेत येत आहे.

11 भरतीच्या नियमांमध्ये प्रक्रिया पुर्ण होईतोपर्यंत सुधारित शासन निर्णय/ परिपत्रकानुसार बदल होऊ शकतो.

12 उपरोक्त बाबींचा अंतर्भाव असलेला परिपूर्ण अर्ज पात्र उमेदवारांनी विहित मुदतीमध्ये व विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. प्राप्त अर्जापैकी छाननीनंतर केवळ पात्र ठरणाऱ्या उमेदवारांचीच लेखी परीक्षा घेतील जाईल याची नोंद घ्यावी.

## कोतवाल पदभरतीकरीता कालबध्द कार्यक्रम.

| अ.क्र. | कार्यक्रमाचा तपशिल | निश्चित केलेला अंतिम दिनांक |
|---|---|---|
| 1 | आरक्षण निहाय सजाची निश्चीती करणे व आरक्षण सोडतीचा दिनांक | आरक्षण सोडतीचे ठिकाण नगरपरिषद हॉल,मयुर बाग,पन्हाळा एस टी स्टॅण्ड जवळ,दिनांक 10.08.2023 वेळ दुपारी 11.00 वाजता |
| 2 | जाहिरनामा प्रसिध्दीचा दिनांक | दिनांक 11.08.2023, स्थळ गाव चावडी, ग्रामपंचायत कार्यालय नोटीस बोर्ड |
| 3 | पदभरती साठी अर्ज करणेचा कालावधी व ठिकाण | दिनांक 11.08.2023 ते दिनांक 24.08.2023 पर्यंत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) सकाळी 9.45 ते सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत तहसिलदार कार्यालय पन्हाळा येथे |
| 4 | अर्जाची छाननी करून पात्र/अपात्र उमेदवारांची गावनिहाय यादी प्रसिध्द करणे | दिनांक 28.08.2023 रोजी सकाळी 11.00 वाजता, तहसिलदार कार्यालय पन्हाळा येथे |
| 5 | आक्षेप नोंदविणे. वरीलप्रमाणे पात्र/अपात्र उमेदवार यादीवर आक्षेप नोंदवणे | अंतरिम यादीवर दिनांक 28.08.2023 रोजी सकाळी 11.00 वाजले पासून ते दिनांक 29.08.2023 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत लेखी आक्षेप, तहसिलदार कार्यालय पन्हाळा येथे सादर करणे |
| 6 | अंतरिम यादीवरील आक्षेप निकाली काढून पात्र उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे | दिनांक 30.08.2023 रोजी सकाळी 11.00 वाजता तहसिलदार कार्यालय पन्हाळा येथे |
| 7 | पात्र उमेदवारांनी स्वतः उपस्थित राहून तहसिल कार्यालयातून प्रवेशपत्र स्विकारणे | दिनांक 30.08.2023 ते दिनांक 01.09.2023 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत तहसिलदार कार्यालय पन्हाळा येथुन घेणे |
| 8 | लेखी परिक्षा | दिनांक 10.09.2023 रोजी सकाळी 11.00 वाजता. प्रवेशपत्रावर नमुद केले परिक्षा केंद्रावर सकाळी 10.00 वाजता उपस्थित राहणेचे आहे. |
| 9 | उत्तर तालिका प्रसिध्द करणे | दिनांक 10.09.2023 रोजी तहसिलदार कार्यालय पन्हाळा येथे उत्तर तालिका सायंकाळी ठिक 05.00 वाजता प्रसिध्द केली जाईल. |
| 10 | उत्तर तालिकेवरील आक्षेप नोंदविण्याची अंतिम तारीख | दिनांक 11.09.2023 सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत तहसिलदार कार्यालय पन्हाळा येथे समक्ष हजर राहून उत्तर तालिकेवरील आक्षेप सादर करणे. |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 11 | अंतिम उत्तर तालिका प्रसिध्द करणे, निकाल व निवड यादी (निकाल) प्रसिध्द करणे | दिनांक 13.09.2023 रोजी दुपारी 03.00 वाजता तहसिलदार कार्यालय पन्हाळा येथे अंतिम उत्तर तालिका, निकाल व अंतिम निवड यादी (निकाल) प्रसिध्द करणेत येईल. |
| 12 | निवड झालेल्या उमेदवारांची मूळ कागदपत्रे पडताळणी करणे | दिनांक 18.09.2023 रोजी निवड झालेल्या उमेदवारांनी मुळ कागदपत्रांच्या पडताळणी करीता, आपले मुळ कागदपत्रासह तहसिलदार कार्यालय पन्हाळा येथे सकाळी ठिक 10.00 वाजता उपस्थित राहणेचे आहे. |
| 13 | निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करणे | दिनांक 20.09.2023 |

कोतवाल भरती संदर्भात कांही वाद निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा अध्यक्ष, कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारीसो पन्हाळा विभाग पन्हाळा यांचे राहतील. तसेच पात्रतेच्या दृष्टीकोणातुन अंतिम निवड करण्याचे अधिकार अध्यक्ष, कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारीसो पन्हाळा विभाग पन्हाळा यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहेत. तसेच पदभरतीच्या अनुषंगाने कोणत्याही टप्प्यावर प्रक्रिया स्थगित करणेचे अधिकार हे पदभरती समितीस राहतील.

(माधवी शिंदे)
**तहसिलदार पन्हाळा तथा**
**सदस्य कोतवाल निवड समिती**

प्रतः

1) मा.जिल्हाधिकारीसो कोल्हापूर कार्यासन 8 वतन यांना माहितीसाठी सविनय सादर.
2) मा.अध्यक्ष, कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारीसो पन्हाळा उपविभाग पन्हाळा यांना माहितीसाठी सविनय सादर.
4) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, कोल्हापूर यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
5) गट विकास अधिकारी, पंचायत समिती पन्हाळा, जि.पन्हाळा यांना माहितसाठी रवाना.

/- सदरचा जाहीरनामा पंचायत समितीच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन, त्याचा प्रसिध्द अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

6) तलाठी ------------- -------------------- ता.पन्हाळा जि कोल्हापूर यांसी

/- सदरचा जाहीरनामा आपले गाव चावडीच्या नोटीस बोर्डवार प्रसिध्द करुन त्या बाबतचा प्रसिध्दीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. तसेच आपले सजातील सर्व गांवामध्ये या बाबतची दवंडी देवून, दंवडी उता-याची प्रत या कार्यालयाकडे तात्काळ सादर करावी. तसेच सदर जाहीरनाम्याची प्रत आपले सजातील सर्व गावातील स्वस्त धान्य दुकाने यांचे नोटीस बोर्डवर, विविध युवक मंडळांच्या वार्ता फलकावर, सहकारी संस्थांच्या नोटीस बोर्डवर, दुध डेअरीच्या नोटीस बोर्डवर, तालीम व व्यायाम मंडळांच्या वार्ताफलकावर प्रसिध्द करुन त्या बाबतचा पोहचवून त्या बाबतचा अहवाल सादर करावा

7) ग्रामसेवक, ग्रामपंचायत ---------------------------------------- ता.पन्हाळा जि.कोल्हापूर यांसी.

/- सदरचा जाहीरनामा आपले ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन, जाहीरनामा प्रसिध्द केले बाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

8) जिल्हा माहिती अधिकारी, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत कसबा बावडा

सदर जाहिरनामा सर्व प्रसारमाध्यमाव्दारे जाहिर प्रसिध्द करणेत यावा व त्या बाबतचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करणेत यावा हि विनंती.

(माधवी शिंदे)
**तहसिलदार पन्हाळा तथा**
**सदस्य कोतवाल निवड समिती**

Scanned by CamScanner